लोकमत
epaper.lokmat.com
शुक्रवार, दि. ३० जुलै २०२१

'विवेकानंद'ला सर्वसाधारण विजेतेपद

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव : सात महाविद्यालयांना विभागवार विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध १९ कलाप्रकारांमधील दमदार सादरीकरणाच्या जोरावर विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या ४० व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. या महाविद्यालयाने माजी कुलगुरू आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषक मिळविला. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील सात महाविद्यालयांनी विभागवार विजेतेपदावर नाव कोरले. त्यांनी विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव विभागवार विजेतेपदाचा फिरता चषक मिळविला.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने

यावर्षीचा जिल्हास्तरीय आणि मध्यवर्ती युवा महोत्सव ऑनलाईन पध्दतीने घेतला. त्यातील अंतिम निकाल विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाने गुरुवारी जाहीर केला. विजेतेपद प्रदान करण्याचा कार्यक्रम विद्यापीठाकडून घेण्यात येईल, अशी माहिती विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

विभागवार विजेतेपद : ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज सातारा, कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय इस्लामपूर, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज विद्यानगर कऱ्हाड (वाङ्मय विभाग), देशभक्त रत्नाप्पा कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (संगीत विभाग), मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली (नृत्य विभाग), ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज सातारा, केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग गोकुळ शिरगाव (नाट्य विभाग), मुधोजी कॉलेज फलटण (कला विभाग) यांचा समावेश आहे.

कलाप्रकारनिहाय विजेते विद्यार्थी...

विजेत्यांची नावे अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ

- **वक्तृत्व मराठी :** श्वेता कारंडे, स्नेहा पाटील, स्वरदा फडणीस, पूजा जंबगी. **हिंदी :** साईसिमरन घाशी, रुबिणा मुल्ला, प्रणव भोसले, श्रुती सुतार. **इंग्रजी :** कल्याणी सव्वाशे, निहारिका शेट्टी, कनक सिंग.
- **सुगम गायन :** प्रतीक्षा पोवार, दीपाली गायकवाड, चारुकेशी चव्हाण, कैवल्य पाटील, शीतल पोतदार, प्राजक्ता पुजारी.
- **शास्त्रीय गायन :** सनिका फडके, भैरव किरपेकर, शीतल पोतदार.
- **पाश्चिमात्य एकल गायन :** चारुकेशी चव्हाण, वरुण तिवारी, कणक सिंग.
- **शास्त्रीय सूरवाद्य :** ऋतुराज धूपकर, ओंकार सुतार, मयुरेश शिखरे.
- **शास्त्रीय तालवाद्य :** मयुरेश शिखरे, प्रथमेश पोतदार, ऋषिकेश गुरव.
- **पाश्चिमात्य एकल वाद्यवादन :** ऋषिकेश गुरव, मयुरेश शिखरे, प्रथमेश जंगम.
- **शास्त्रीय नृत्य :** वेदिका कुष्टे, रितिका निने, सार्थक भिलारी, मनाली संकपाळ.
- **नकला :** ओमेश तोगलवार, गणेश चिंचकर, प्रकाश कोळी, रविराज भिसे.
- **एकपात्री अभिनय :** स्वरदा फडणीस, सौरभ कराडे, आकाश पाटील, शामल टकले.
- **व्यंगचित्रे :** अतुल कापडे, तेजस्विनी डाळे, सुगंधा धनवडे.
- **भित्तीचित्र :** प्रतिभा दुंडगे, तृप्ती पटेल, ऐश्वर्या पवार. **स्थळचित्र :** गुरुनाथ म्हातुगडे, ऋषिकेश रजपूत, कुणाल माने.
- **कातरकाम :** केवल यादव, विवेक कांबळे, सुचिता तारळेकर. **मातीकाम :** कुणाल महोरकर, सानिका मिटके, कौस्तुभ शिरसट.
- **रांगोळी :** सुनील कुंभार, ओमकार शिरगुप्पर, निकिता पवार.
- **मेहंदी :** प्रणोती पाटील, कोमल कांडेकर, बुशरा शेख.

fol 30/7/2021

PR 30.7.21

लोकसत्ता

पुणे, शुक्रवार, ३० जुलै २०२१

॥ ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥ शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

(AUTONOMOUS)

Tarabai Park,Kolhapur.

(Accredited "A" with CGPA 3.24 by NAAC,
College with Potential for Excellence ISO 9001-2015)

College Website: www.vivekanandcollege.org. Office: 0231-2658612

P.G. ADMISSION NOTIFICATION 2021-2022

Vivekanand College,Kolhapur (Autonomous) announces Entrance Examination 2021-2022 for admission to the following P.G. programmes.

Sr. No.	Name of the P.G.Programme	Intake Capacity	Eligibility
1	M.Sc. Physics	20	B.Sc.with Physics
2	M.Sc. Organic Chemistry	40	B.Sc.with Chemistry
3	M.Sc. Inorganic Chemistry	20	B.Sc.with Chemistry
4	M.Sc. Mathematics	50	B.Sc.with Mathematics
5	M.Com.(Advanced Accountancy)	50	B.Com.with Accountancy
	M.Com.(Advanced Costing)	50	B.Com.with Costing
	M.Com. (Business Administration)	50	B.Com.with Industrial Management

Candidates have to fill up the **ONLINE FORM** of Entrance Examination which will be available on the **College website: www.vivekanandcollege.org** from Thursday 29th July 2021. Date of Entrance Examination for admission to P.G.programmes will be declared later on the college website.

Entrance Examination Details

1) Entrance Examination will be conducted through OFFLINE MODE.
2) Date for online Registration/application (with registration fees) are as follows:
i) 31st July 2021 to 12th August 2021: Rs.250/-
ii) 13th August 2021 to 16th August 2021: Rs.350/- (with Late fee)
iii) 17th August 2021 to 20th August 2021: Rs.500/- (with Super Late fee)

For further details visit the College website: www.vivekanandcollege.org

DR. R.R. KUMBHAR
PRINCIPAL
Vivekanand College, Kolhapur

Place: KOLHAPUR
Date: 29th July 2021

321

पुढारी

कोल्हापूर, शुक्रवार, ३० जुलै २०२१

विवेकानंद कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद

विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धेचा निकाल जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या ऑनलाईन ४० व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विविध कला प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. माजी कुलगुरू आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषकाचे मानकरी ठरले आहे.

विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने यावर्षी प्रथमच कोरोनामुळे युवा महोत्सव ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला. मध्यवर्ती युवा महोत्सव पार पडला असून विद्यापीठाने स्पर्धेचा अंतिम निकाल जाहीर केला आहे. यात विविध १९ कला प्रकारांचा समावेश होता.

शिवाजी विद्यापीठातून...

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव विभागावर विजेतेपद फिरता चषक वाङ्मय प्रकारात ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा, श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर व सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर कराड यांना विभागून दिला आहे.

संगीत कलाप्रकारात देशभक्त रत्नाप्पा कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, नृत्य प्रकारात श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगलीने चषक पटकावला आहे. नाट्य विभागात ईस्माइलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज सातारा व केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग गोकुळ शिरगाव यांना क्रमांक विभागून देण्यात आला आहे. कला प्रकारातील चषक मुधोजी कॉलेज फलटणने जिंकला. मध्यवर्ती युवा महोत्सवाचे विभागवार विजेतेपद चषक व सर्वसाधारण विजेतेपद चषक प्राप्त महाविद्यालयांना प्रदान करण्याचा कार्यक्रम होणार आहे. याबाबत स्वतंत्रपणे महाविद्यालयांना कळविण्यात येईल, असे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी सांगितले.

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार,
३० जुलै २०२१

।। ज्ञान,विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।। शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

(AUTONOMOUS)

Tarabai Park,Kolhapur.

(Accredited "A" with CGPA 3.24 by NAAC,
College with Potential for Excellence ISO 9001-2015)

College Website: www.vivekanandcollege.org. Office: 0231-2658612

P.G. ADMISSION NOTIFICATION 2021-2022

Vivekanand College,Kolhapur (Autonomous) announces Entrance Examination 2021-2022 for admission to the following P.G. programmes.

Sr. No.	Name of the P.G.Programme	Intake Capacity	Eligibility
1	M.Sc. Physics	20	B.Sc.with Physics
2	M.Sc. Organic Chemistry	40	B.Sc.with Chemistry
3	M.Sc. Inorganic Chemistry	20	B.Sc.with Chemistry
4	M.Sc. Mathematics	50	B.Sc.with Mathematics
5	M.Com.(Advanced Accountancy)	50	B.Com.with Accountancy
	M.Com.(Advanced Costing)	50	B.Com.with Costing
	M.Com. (Business Administration)	50	B.Com.with Industrial Management

Candidates have to fill up the **ONLINE FORM** of Entrance Examination which will be available on the **College website: www.vivekanandcollege.org** from Thursday 29th July 2021. Date of Entrance Examination for admission to P.G.programmes will be declared later on the college website.

..... Entrance Examination Details .....

1) Entrance Examination will be conducted through OFFLINE MODE.
2) Date for online Registration/application (with registration fees) are as follows:
i) 31st July 2021 to 12th August 2021: Rs.250/-
ii) 13th August 2021 to 16th August 2021: Rs.350/- (with Late fee)
iii) 17th August 2021 to 20th August 2021: Rs.500/- (with Super Late fee)

For further details visit the College website: www.vivekanandcollege.org

DR. R.R. KUMBHAR
PRINCIPAL
Vivekanand College, Kolhapur

Place: KOLHAPUR
Date: 29th July 2021

2021.

तरुण भारत

शुक्रवार, ३० जुलै २०२१

'विवेकानंद'ला सर्वसाधारण विजेतेपद

शिवाजी विद्यापीठ मध्यवर्ती युवा महोत्सवाचा निकाल संकेतस्थळावर उपलब्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मध्यवर्ती युवा महोत्सवाचा निकाल ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे. या महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद कॉलेजने पटकावले असून, माजी कुलगुरु स्व. आप्पासाहेब पवार चांदीचा फिरता चषक विवेकानंदने पटकावला आहे. या महोत्सवाचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रातून विवेकानंद कॉलेजवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत जिल्हास्तरीय युवा महोत्सव पार पडला. या महोत्सवातील विजेत्या स्पर्धकांचा समावेश मध्यवर्ती युवा महोत्सवात करण्यात आला होता. मध्यवर्ती युवा महोत्सव सहभागी झालेल्या सर्वच स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक देवून गौरवण्यात येणार आहे.

विभागवार विजेतेपद चषक व सर्वसाधारण विजेतेपद चषक प्राप्त महाविद्यालयांना प्रदान कार्यक्रम सवडीने आयोजित केला जाणार आहे. वक्तृत्व, सुगम गायन, शास्त्रीय गायन, पाश्चिमात्य एकल गायन, शास्त्रीय सुरवाद्य, शास्त्रीय तालवाद्य, पाश्चिमात्य एकल वाद्यवादन, शास्त्रीय नृत्य, नकला, एकपात्री अभिनय, व्यंगचित्र, भित्तीचित्र, स्थळचित्र, कातरकाम, मातीकाम, रांगोळी, मेहंदी या कलाप्रकाराचा समावेश होता. मध्यवर्ती युवा महोत्सवाचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याची नोंद सहभागी स्पर्धकांनी घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.